ॐ

****************************************

# गीता-गीताई

***************************

मूळ संस्कृत गीता
व
विनोबांनी लिहिलेली गीताई
यांचे संकलन !
एकट्याने वा समूहाने अर्थपूर्णरितीने
म्हणण्यासाठी उपयुक्त !

संकलन
**ज्ञान प्रबोधिनी**

# भूमिका

पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत दैनंदिन प्रार्थनेच्या वेळी गीतेचे श्लोक म्हणताना प्रत्येक श्लोकापाठोपाठ त्याचा गीताईतील मराठी अनुवाद म्हणायची पद्धत सुरू झाली. अर्थ समजण्यासाठी गीताई खूपच सोयिस्कर आहे. संस्कृतातली गीता म्हणता आल्याने संस्कृत भाषेची तोंडओळख होते. प्रदीर्घ भारतीय परंपरेचा संस्कृतमधला ठेवा आपल्याही आवाक्यात येऊ शकतो हे कळते. व्यक्तिमत्त्वाच्या घडणीसाठी गीतेचा अर्थ कळणे आवश्यक आहेच. जीवनातील विविध प्रश्नांचा सखोल विचार करण्याची परंपरा आपल्या देशात आहे हे कळणे व त्याचा अभिमान वाटणे हे ही व्यक्तिमत्त्वाच्या घडणीसाठी आवश्यक आहे. एक भारतीय म्हणून व्यक्तिमत्त्व घडण्यासाठी संस्कृत भाषेचा अभिमान वाटणे उपयुक्त आहे.

गांधीजींनी इंग्लंडमध्ये असताना सर्वप्रथम गीतेचा इंग्रजी अनुवाद वाचला. आपल्याला गीतेची माहितीच नाही याची लाज वाटून त्यांनी संस्कृत मधली गीता प्रयत्नपूर्वक समजून घेतली. आज संस्कृत गीतेचा थेट अर्थ कळणे अनेक विद्यार्थ्यांना शक्य नसल्याने गीता-गीताईच्या संयुक्त पठणाची कल्पना निघाली. आतापर्यंत त्यासाठी दोन पुस्तके समोर ठेवून पठण करायला लागायचे. या पुस्तिकेच्या निमित्ताने एकाच पुस्तकातून गीताईच्या रूपाने अर्थ व गीतेच्या रूपाने संस्कृत शब्द एकत्र कळण्याची सोय झाली आहे. या पुस्तिकेच्या मदतीने गीता-गीताईच्या संयुक्त पठणाची प्रथा अनेक ठिकाणी सुरू करता येईल.

**– संचालक, ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

एक वर्षाच्या आत गीता-गीताईची पहिली आवृत्ती संपली अनेकांना गीता-गीताईची कल्पना आवडली. याचा प्रसार व्हावा, हजारो मुला-मुलींपर्यंत ती पोहोचावी अशी तीव्र इच्छा मनामध्ये होती. नाममात्र किंमतीमध्ये ती विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी गीता-गीताईप्रेमी मंडळींनी आवश्यक ते अर्थसाहाय्य करण्याचे मान्य केले, काही शाळांनी उत्साहवर्धक प्रतिसाद दिला व परंधाम प्रकाशनातर्फे ही आवृत्ती छापण्यास मान्यता दिली, या सर्वांच्या सहकार्यामुळे दुसऱ्या आवृत्तीच्या छपाईला हुरूप आला. गीताईच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये दुसरी आवृत्ती छापण्याचा योग येत आहे ही मोठी भाग्याची व आनंदाची गोष्ट आहे.

पहिल्या आवृत्तीत राहिलेल्या काही चुका व सलग म्हणता येण्यासाठी घातलेली भर यामुळे ही पुस्तिका अधिक अचूक व वापरण्यास उपयुक्त होईल असा विश्वास वाटतो.

बाजारू आकर्षणाच्या, भूलभुलैय्येच्या दुनियेत जीवनाच्या चिरंतन मूल्यांचा संस्कार विद्यार्थिदशेपासूनच व्हावा यासाठी, गीता-गीताईच्या अर्थपूर्ण पठणाचा उपयोग व्हावा ही प्रार्थना.

---

गीता-गीताईचे एकत्रित प्रकाशन सर्वप्रथम परंधाम प्रकाशनातर्फे झाले असून त्यांनी एका पानावर गीतेचे श्लोक व त्याच्या समोरील पानावर गीताईचे श्लोक याप्रमाणे आदरणीय विनोबांच्या सूचनांचे पालन करून ती छापली आहे. ती परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा येथे उपलब्ध आहे.

# गीता-गीताईच्या छपाईबाबत खुलासा

गीतेच्या पठणाच्या सोयीसाठी प्रत्येक चरणानंतर सन्धिविग्रह करून तेथे स्वल्पविराम दिला आहे.

दोन चरण सलग म्हणताना सन्धी करून म्हणावे. तसे म्हणताना आधीच्या चरणाच्या शेवटच्या अक्षरात अपेक्षित बदल स्वल्पविरामानंतर कंसामध्ये दाखवला आहे.

ज्या ठिकाणी शब्द एक असूनही चरण वेगळा दाखवण्यासाठी तो शब्द तोडावा लागला आहे तेथे सलग म्हणताना तो शब्द एकत्र म्हणावा हे दर्शविण्यासाठी स्वल्पविरामानंतर कंसात (–) हे चि वापरले आहे. उदा. अध्याय ६, श्लोक ९, पहिली ओळ.

दोन चरण सलग म्हणत असताना ज्या ठिकाणी चरणाच्या शेवटच्या न् च्या जागी अनुस्वारयुक्त स् अथवा श् होतो तेथे तो कंसात (ँ स्) अथवा (ँ श्) असा दाखवला आहे.
उदा. अध्याय ५, श्लोक २७, पहिली ओळ, अध्याय ६, श्लोक २४, पहिली ओळ. गीताईचे शुद्धलेखन मूळ गीताई प्रमाणेच ठेवले आहे; त्यात चरण तोडून दाखवलेले नाहीत. चरण तोडून म्हणावयाचे झाल्यास बहुसंख्य श्लोकांमध्ये (अनुष्टुभ् वृत्तातील दोन ओळींचे श्लोक) आठव्या अक्षरानंतर चरण संपतो.

च्, ज्, झ् यांच्या खाली टिंब असतानाचे व नसतानाचे उच्चार वेगवेगळे आहेत.

उदा. च़ – त्याच़ गावात, च़ालता, च – रचना, चिंतन
ज – ज़मले, ज़े, ज – जग, जन्म
झ – झुंज़े, माझा, झ– झिज़विणे

# अनुक्रमणिका


| अध्याय क्रमांक | अध्यायाचे नाव | श्लोक संख्या | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | अर्जुनविषादयोग | ४७ | ३ |
| २. | सांख्ययोग | ७२ | १४ |
| ३. | कर्मयोग | ४३ | ३१ |
| ४. | ज्ञानकर्मसंन्यासयोग | ४२ | ४१ |
| ५. | कर्मसंन्यासयोग | २९ | ५० |
| ६. | ध्यानयोग | ४७ | ५७ |
| ७. | ज्ञानविज्ञानयोग | ३० | ६८ |
| ८. | अक्षरब्रह्मयोग | २८ | ७५ |
| ९. | राजविद्याराजगुह्ययोग | ३४ | ८३ |
| १०. | विभूतियोग | ४२ | ९१ |
| ११. | विश्वरूपदर्शनयोग | ५५ | १०१ |
| १२. | भक्तियोग | २० | १२१ |
| १३. | क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग | ३४ | १२६ |
| १४. | गुणत्रयविभागयोग | २७ | १३४ |
| १५. | पुरुषोत्तमयोग | २० | १४० |
| १६. | दैवासुरसंपद्विभागयोग | २४ | १४६ |
| १७. | श्रद्धात्रयविभागयोग | २८ | १५२ |
| १८. | मोक्षसंन्यासयोग | ७८ | १५९ |
| | एकूण श्लोकसंख्या | ७०० | |

**प्रथम आवृत्ती** : सौर आषाढ, शके १९२५
जुलै २००३

**पुनर्मुद्रण–५** : सौर कार्तिक, शके १९३९
नोव्हेंबर २०१७

**(आजअखेर ३५,००० प्रतींचे वितरण)**

**मूल्य - ₹ २०**

(५० किंवा त्यापेक्षा अधिक प्रती घेतल्यास मूल्य ₹ १६)

---

**मुख्य कार्यालय :** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030 ☎ (०२०) २४२०७१७४/१७५

---

**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org